कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमधील लाभाच्या बाबी व घटकांबाबत शासन प्रक्रिया पुनर्रचना करून सुधारित कार्यपद्धती लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
शासन निर्णय क्रमांक : जीपीआर-२०२६/प्र.क्र.२६८/१३-अे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १४ ऑक्टोबर २०२६

वाचा:- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१७२५/प्र.क्र.१२६/मातं, दि. ३०.०५.२०२५.
२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/का.१४११, दि. ०३.०८.२०२६.
३. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३.०९.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त दि. १०.०९.२०२६

प्रस्तावना:

कृषि विभागामार्फत विविध केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येतात. सदर योजनांचा लाभ शेतकरी, शेतकरी गट, उद्योजक, निविष्ठा विक्रेते, उत्पादक, रोपवाटिकाधारक अशा विविध घटकांना सूक्ष्म सिंचन, कृषि यंत्रसामग्री, फळबाग लागवड, संरक्षित शेती, शेततळे, पीक उत्पादन, बियाणे, कृषि निविष्ठा, पीक संरक्षण, कृषि व अन्न प्रक्रिया, सामूहिक/गट शेती तसेच इतर अनुषंगिक बाबींसाठी देण्यात येतो.

कृषि विभागाच्या योजनांतर्गत काही लाभाच्या बाबी एकापेक्षा अधिक योजनांमधून देण्यात येत असल्याने शेतकऱ्याच्या दृष्टिकोनातून विचार करता, त्याला लाभ कोणत्या योजनेंतर्गत मिळतो ही बाब गौण ठरत असल्याचे लक्षात घेऊन शासनाने सन २०१९-२० पासून शेतकऱ्यांना MahaDBT Farmer Portal च्या माध्यमातून बाबनिहाय अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. या पोर्टलद्वारे शेतकऱ्यास त्याच्या आवश्यकतेनुसार त्याच्या पसंतीच्या बाबीसाठी अर्ज सादर करता येतो. शेतकऱ्याचा अर्ज सदर बाब अनुज्ञेय असलेल्या सर्व योजनांसाठी ग्राह्य धरण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, योजनांची पारंपारिक चौकट मोडून समान बाबींसाठी सर्व योजनांतर्गत एकसमान मंजूरी प्रक्रिया, कागदपत्रे, पडताळणी पद्धती व मंजुरीचे स्तर निर्माण केले आहेत.

सद्यस्थितीत हा लाभ MahaDBT Farmer Portal च्या माध्यमातून देण्यात येत आहे. मात्र, योजनांच्या लाभासाठीचे अर्ज व आवश्यक कागदपत्रे यांची निश्चिती फार पूर्वी करण्यात आलेली आहे. दरम्यानच्या कालावधीत तंत्रज्ञानातील प्रगती, विविध डेटासेट (AgriStack, MahaSarthi, DigiLocker इ.) तसेच विविध शासकीय डिजिटल प्रणालीसोबत संगणकीय जोडणी झालेली असल्यामुळे लाभार्थ्यांची ओळख व प्रमाणीकरण, शेतजमीन व तिची धारणा/मालकी, ७/१२ व ८-अ उतारा, पीक व पिकाखालील क्षेत्र, बँक खाते, जात, उत्पन्न व रहिवासी स्थिती, पूर्वी घेतलेल्या योजनांच्या लाभाची माहिती, संस्थांची नोंदणी इ. माहिती स्वयंचलितपणे प्राप्त करून घेणे शक्य झाले असल्यामुळे काही बाबींसाठी कागदपत्रे घेणे कालबाह्य झाले आहे व त्यामुळे अर्ज मंजुरीचे काही टप्पे देखील कमी करणे शक्य झालेले आहे. या पार्श्वभूमीवर सध्याच्या कार्यपद्धतीमधील अनावश्यक ठरत असलेली माहिती कमी करणे, कागदपत्रांची संख्या कमी करणे, शासनाकडे आधीच उपलब्ध असलेल्या माहितीचा पुनर्वापर करणे, अर्ज मंजुरीचे टप्पे कमी करणे इ. बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या.

समान स्वरूपाच्या लाभाच्या बाबींसाठी एकसमान, सुलभ, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित अशी सर्वसमावेशक प्रशासकीय कार्यपद्धती निश्चित करणे, त्यानुषंगाने विद्यमान योजनांची कार्यपद्धती, अर्जप्रक्रिया, कागदपत्रांची आवश्यकता, छाननी व मंजुरीचे टप्पे यांचा सर्वंकष अभ्यास करून तसेच संबंधित क्षेत्रीय अधिकारी, तज्ज्ञ व भागधारक (Stakeholders) यांच्याशी विचारविनिमय करून सविस्तर योजनानिहाय व बाबनिहाय आढावा घेण्यात आला आणि सदर आढाव्याअंती कृषि विभागाच्या योजनांच्या प्रशासकीय प्रक्रियेची पुनर्रचना (Governance Process Re-engineering) पूर्ण करण्यात आले असून सदर योजनांच्या अंमलबाजवणीची सुधारित कार्यपद्धती विहित करण्याच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:**

१. कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमधील लाभाच्या बाबनिहाय व घटकनिहाय प्रशासकीय प्रक्रियेची पुनर्रचना (GPR) करण्यात आली असून या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या बाबनिहाय व घटकनिहाय सुधारित कार्यपद्धतीस शासन मान्यता देण्यात येत असून या सुधारित कार्यपद्धतीनुसारच संबंधित योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी. सदर २१ योजनांचा तपशिल खालीलप्रमाणे:

  १. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन घटक)
  २. कृषी यांत्रिकीकरण उपअभियान व राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना
  ३. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना
  ४. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान
  ५. काजू कलमे वाटप योजना

६. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (आदिवासी उपयोजना बाहेरील)
७. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (आदिवासी उपयोजना)
८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना
९. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना
१०.मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना - अन्न प्रक्रिया प्रकल्प
११.मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना - शेततळे
१२.राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - तेलबिया
१३.राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान
१४.राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - कडधान्य आत्मनिर्भरता अभियान
१५.राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - कापूस उत्पादकता अभियान
१६.राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यावसायिक पिके (ऊस)
१७.परंपरागत कृषी विकास योजना
१८. राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान
१९.पीक स्पर्धा (खरीप व रब्बी)
२०.कृषी पुरस्कार योजना
२१.राज्य विस्तार कार्यक्रमास सहाय्य (आत्मा)

२. सदर सुधारित कार्यपद्धतीमध्ये अर्ज प्रक्रिया, आवश्यक माहिती व कागदपत्रे, छाननी, पडताळणी, मंजुरी, लाभ वितरण तसेच संबंधित प्रशासकीय टप्प्यांचा समावेश असून, यापुढे संबंधित योजनांच्या अंमलबजावणीमध्ये परिशिष्टात नमूद केलेल्या प्रक्रियेचा अवलंब करण्यात यावा.

३. कृषि विभागाच्या विविध योजनांमध्ये समान स्वरूपाच्या बाबी/घटकांचा लाभ एकापेक्षा अधिक योजनांअंतर्गत देण्यात येत असल्याने, परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या बाबी/घटक ज्या-ज्या योजनांमध्ये समाविष्ट आहेत, त्या सर्व योजनांच्या अंमलबजावणीस सदर सुधारित कार्यपद्धती लागू राहील. तसेच, भविष्यात नवीन योजनांमध्ये सदर बाबी/घटक समाविष्ट करण्यात आल्यास, त्यांची अंमलबजावणी देखील याच सुधारित कार्यपद्धतीनुसार करण्यात यावी.

४. आयुक्त (कृषि) यांनी या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित योजनांच्या विद्यमान मार्गदर्शक सूचना/कार्यपद्धतीमध्ये आवश्यक ते बदल करावेत तसेच सदर सुधारित कार्यपद्धतीनुसार संबंधित योजनांची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

५. आयुक्त (कृषि) यांनी सदर सुधारित कार्यपद्धतीनुसार MahaDBT Farmer Portal महा-आयटीच्या सहकार्याने सुधारित करून घ्यावे.

६. सदर GPR मुळे संबंधित योजनांमधील मंजूर लाभाचे स्वरूप, पात्रता निकष, अनुदानाचे प्रमाण अथवा आर्थिक तरतुदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. संबंधित योजनांसाठी लागू असलेल्या शासन निर्णय, मार्गदर्शक सूचना, आर्थिक व वैधानिक तरतुदींनुसारच लाभ देण्यात यावा.

७. सदर शासन निर्णयातील सर्व अटी व सुधारित कार्यपद्धती ही महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (MahaIT) मार्फत संबंधित ऑनलाईन प्रणालीचा विकास (System Development) पूर्ण होऊन सदर सेवा प्रणालीवर गो-लाईव्ह (Go-Live) झाल्याच्या दिनांकापासून लागू राहतील.

८. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या दि. ०३.०८.२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार गठित शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीने दि. ०३.०९.२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०१४१११४१४४४४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKANT
CHANDRAKANT ANDGE

Digitally signed by SHRIKANT CHANDRAKANT ANDGE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf Dept, 2.5.4.20=5D5AB93B4E4F2FCD87E12FE19B8965025D482B1BEE0FFFAA62085C34DB6BFD8C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D8D9626C9E038380CD235C048F20D7CE74CFFD3A95F2AC3C192E9C991F358271, cn=SHRIKANT CHANDRAKANT ANDGE
Date: 2026.10.14 11:15:16 +05'30'

**( श्रीकांत आंडगे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद / मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेते, विधान सभा / विधानपरिषद, मुंबई.
७. मा. मंत्री (कृषि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मुख्य आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, मुंबई.
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

१०.अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (वित्त / नियोजन / सामान्य प्रशासन / माहिती तंत्रज्ञान), मंत्रालय, मुंबई.

११.आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

१३.सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी / सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी.

१४.सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५.निवड नस्ती (कार्यासन १३-अे).

## शासन निर्णय क्र. जीपीआर-२०२६/प्र.क्र.२६८/१३-अे दि. १४.१०.२०२६ यासोबतचे परिशिष्ट:-

## परिशिष्ट 'अ' : बाबनिहाय व घटकनिहाय सुधारित कार्यपद्धती

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | पीक प्रात्यक्षिक एकूण रकाने (Fields) -१८,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १३,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-५, | **पीक प्रात्यक्षिक करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने** (Fields)- १३ | | **१. राष्ट्रीय खाद्यतेल अभियान- तेलबिया (एनएमईओ-तेलबिया)**<br>**२. राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियान** (National Food Security and Nutrition Mission - NFSNM)<br>**३. कडधान्यांमध्ये आत्मनिर्भरता अभियान** (Mission for Atmanirbharta in Pulses) |
| | | | १ | नोंदणी प्रमाणपत्रानुसार शेतकरी गटाचे नाव | |
| | | | २ | गटाचा प्रकार | |
| | | | ३ | स्थापना दिनांक | |
| | | | ४ | गट नोंदणी क्रमांक | |
| | | | ५ | जिल्हा | |
| | | | ६ | तालुका | |
| | | | ७ | गाव/शहर | |
| | | | ८ | ठरावानुसार व शेतकरी ओळखपत्रानुसार अधिकृत सदस्याचे नाव | |
| | | | ९ | अधिकृत सदस्याचा शेतकरी ओळखपत्र क्रमांक | |
| | | | १० | घटक | |
| | | | ११ | पीक प्रकार | |
| | | | १२ | पिकाचे नाव | |
| | | | १३ | प्रात्यक्षिकाचा प्रकार | |
| | | बियाणे वाटप एकूण रकाने (Fields)- २३,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ६,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१७ | **बियाणे वाटप करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने** (Fields)- ६ | | |
| | | | १ | जात प्रवर्ग | |
| | | | २ | कोणत्याही प्रकारचे दिव्यांगत्व | |
| | | | ३ | घटक (Component) | |
| | | | ४ | पिकाचा प्रकार | |
| | | | ५ | पिकाचे नाव | |
| | | | ६ | अर्ज केलेले क्षेत्र | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण १ कागदपत्र-** (शेतकरी गट/कंपनी/सहकारी संस्था यांचे नोंदणी प्रणामपत्र) | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **एकूण मंजूरी स्तर - १**<br>तालुका कृषि अधिकारी (मंजूरी/रद्द/परत पाठविणे) | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | पीक प्रात्यक्षिक एकूण रकाने (Fields) -१८,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १३,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-५, | **पीक प्रात्यक्षिक करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १३** | | **१. कापूस उत्पादकता वाढ अभियान (Mission for Cotton Productivity - MCP) (फक्त पिक प्रात्यक्षिके)**<br>**२. राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान (ऊस) (फक्त पिक प्रात्यक्षिके)** |
| | | | १ | नोंदणी प्रमाणपत्रानुसार शेतकरी गटाचे नाव | |
| | | | २ | गटाचा प्रकार | |
| | | | ३ | स्थापना दिनांक | |
| | | | ४ | गट नोंदणी क्रमांक | |
| | | | ५ | जिल्हा | |
| | | | ६ | तालुका | |
| | | | ७ | गाव / शहर | |
| | | | ८ | ठरावानुसार व शेतकरी ओळखपत्रानुसार अधिकृत सदस्याचे नाव | |
| | | | ९ | अधिकृत सदस्याचा शेतकरी ओळख क्रमांक | |
| | | | १० | घटक (Component) | |
| | | | ११ | पिकाचा प्रकार | |
| | | | १२ | पिकाचे नाव | |
| | | | १३ | प्रात्यक्षिकाचा प्रकार | |
| | | फ्लेक्सी घटक एकूण रकाने (Fields)- २२/२३,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ५/६,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१७ | **बियाणे वाटप करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ६** | | |
| | | | १ | जात प्रवर्ग | |
| | | | २ | कोणत्याही प्रकारचे दिव्यांगत्व | |
| | | | ३ | घटक (Component) | |
| | | | ४ | पिकाचा प्रकार | |
| | | | ५ | पिकाचे नाव | |
| | | | ६ | अर्ज केलेले क्षेत्र | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण १ कागदपत्र-** (शेतकरी गट/कंपनी/सहकारी संस्था यांचे नोंदणी प्रणामपत्र) | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **एकूण मंजूरी स्तर - १ -** तालुका कृषि अधिकारी (मंजूरी/रद्द/परत पाठविणे) | | | |
| अ. | अर्जातील रकान्यांची संख्या (Number of fields in Application Form) | **अ. वैयक्तिक यांत्रिकीकरण घटकासाठी भरले** जाणारे एकूण रकाने-१६,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ७,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-९. | | **वैयक्तिक यांत्रिकीकरण घटकासाठी अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ७** | **१. कृषी यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM)**<br>**२. राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना** |
| | | | १ | शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) | |
| | | | २ | प्रमुख घटक | |
| | | | ३ | बाब / तपशील | |
| | | | ४ | व्हील ड्राईव्ह प्रकार | |
| | | | ५ | एच.पी. श्रेणी | |
| | | | ६ | यंत्र / अवजार / उपकरण प्रकार | |
| | | | ७ | यंत्र/औजारे नाव | |
| | | **ब. कस्टम हायरिंग सेंटर करिता भरले जाणारे** एकूण रकाने (वैयक्तिक लाभार्थी)-१४,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ५,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-९, | | **कस्टम हायरिंग सेंटर करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields) (वैयक्तिक लाभार्थी)- ५** | |
| | | | १ | शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) | |
| | | | २ | प्रमुख घटक | |
| | | | ३ | बाब / तपशील | |
| | | | ४ | यंत्र प्रकार (ड्रोन) | |
| | | | ५ | प्रकल्प खर्च | |
| | | **क.कस्टम हायरिंग सेंटर करिता भरले जाणारे** एकूण रकाने (शेतकरी गट)- २३,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १९,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-४. | | **कस्टम हायरिंग सेंटर करिता भरले जाणारे एकूण रकाने (शेतकरी गट)- १९** | |
| | | | १ | शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) | |
| | | | २ | शेतकरी गटाचे नाव | |
| | | | ३ | गट प्रकार | |
| | | | ४ | स्थापना दिनांक | |
| | | | ५ | गट नोंदणी क्रमांक | |
| | | | ६ | गट कार्यालयाचा नोंदणीकृत पत्ता | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | | ७ | सदस्य संख्या | |
| | | | ८ | अधिकृत सदस्याचे नाव (ठरावानुसार) | |
| | | | ९ | अधिकृत सदस्याचा शेतकरी आयडी | |
| | | | १० | गटाचा ठराव | |
| | | | ११ | सदस्य शेतकरी आयडी | |
| | | | १२ | बँक खाते क्रमांक | |
| | | | १३ | IFSC कोड | |
| | | | १४ | बँक खात्यातील नाव | |
| | | | १५ | बँकेचे नाव | |
| | | | १६ | प्रमुख घटक | |
| | | | १७ | बाब / तपशील | |
| | | | १८ | यंत्र प्रकार (ड्रोन) | |
| | | | १९ | प्रकल्प खर्च | |
| ब. | कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण ७ कागदपत्र-**<br>**पूर्व मंजुरी- ३ (Presanction-३)**<br>१. यंत्रे /औजारे दरपत्रक<br>२. ट्रॅक्टर RC(ट्रॅक्टरचलीत औजारांसाठी),<br>३. शेतकरी गट/कंपनी/सहकारी संस्था यांचे नोंदणी प्रमाणपत्र (CHC साठी ) | | | |
| | | **मंजुरीनंतर- ४ (Postsanction-४)**<br>१. यंत्रे /औजारे खरेदीचे देयक( GST Invoice ),<br>२. ट्रॅक्टर साठी RC बूक,<br>३. कर्ज मंजूरी पत्र १० लाख वरील CHC करिता,<br>४. प्रशिक्षण प्रमाणपत्र (ड्रोन करिता) | | | |
| क. | मंजुरी डेस्कची संख्या (Number of approval desks) | **पूर्व-मंजुरी- २ (Presanction-२)**<br>१. सहाय्यक कृषि अधिकारी, | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | २. तालुका कृषि अधिकारी | | | |
| | | **मंजुरीनंतर- २ (Postsanction-२)**<br>१. उप कृषि अधिकारी/ मंडळ कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | सूक्ष्म सिंचन करिता एकूण रकाने (Fields) -१८,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ५,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१३ | **सूक्ष्म सिंचन करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ५** | | **प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन घटक)** |
| | | | १ | सिंचन साधने व सुविधा निवडा | |
| | | | २ | घटक निवडा (ठिबक / तुषार) | |
| | | | ३ | ठिबक- अंतःस्थ / बाह्यस्थ (Inline/Online) | |
| | | | ४ | तुषार- सूक्ष्म / लघु / चल | |
| | | | ५ | अंतर / नळीचा व्यास | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण ६ कागदपत्र- पूर्व मंजुरी**<br>१. सामाईक खातेदार समतीपत्र<br>२. दरपत्रक ( Quotation)<br>३. हमीपत्र | | | |
| | | **मंजुरी नंतर**<br>१. देयक (Invoice)<br>२. आराखडा (Design)<br>३. काम पूर्णत्वाचा दाखला ( Completion Certificate) | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **पूर्व-मंजुरी- २ (Presanction-२)**<br>१. सहाय्यक कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी, | | | |
| | | **मंजुरीनंतर- ३ (Postsanction-३)**<br>१. उप कृषि अधिकारी,<br>२. मंडळ कृषि अधिकारी,<br>३. तालुका कृषि अधिकारी | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | फळबाग लागवड एकूण रकाने (Fields) -२०,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ६,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१४ | | **फळबाग लागवड अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ६** | **भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना** |
| | | | १ | शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) | |
| | | | २ | दिव्यांग व्यक्ती | |
| | | | ३ | घटक निवडा (फळझाडांची लागवड) | |
| | | | ४ | तपशील (फळपिके) | |
| | | | ५ | पीक निवडा | |
| | | | ६ | अंतर | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण १ कागदपत्र-**<br>१ . देयक (Invoice) | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **पूर्व-मंजुरी- २ (Presanction-२)**<br>१. सहाय्यक कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी | | | |
| | | **मंजुरीनंतर- २ (Postsanction-२)**<br>१. उप कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | तालुका स्तर एकूण रकाने (Fields) -१५,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ४,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-११ | | **तालुका स्तर अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ४** | **एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान** |
| | | | १ | घटक (Component) | |
| | | | २ | प्रस्तावित पीक | |
| | | | ३ | अंतर | |
| | | | ४ | प्रस्तावित क्षेत्र | |
| | | जिल्हा स्तर एकूण रकाने (Fields) -१५,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ४,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-११ | | **जिल्हा स्तर अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ४** | |
| | | | १ | घटक (Component) | |
| | | | २ | उपघटक | |
| | | | ३ | तपशील/क्षमता | |
| | | | ४ | प्रस्तावित क्षेत्र / युनिटची संख्या | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | उपविभाग स्तर एकूण रकाने (Fields) -१३,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-११ | **उपविभाग स्तर अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २** | | |
| | | | १ | प्रस्तावित क्षेत्रफळ (चौ.मी.) | |
| | | | २ | हरितगृह / शेडनेटगृह संरचनेचा प्रकार | |
| | | राज्य स्तर एकूण रकाने (Fields) -१२,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-११ | **राज्य स्तर अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १** | | |
| | | | १ | प्रस्तावित आकार/क्षमता | |
| | | **तालुका स्तर एकूण ३ कागदपत्र-**<br>१. शेतकरी आयडी (Farmer ID)<br>२. जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>३. वनहक्क कायदा (FRA) अंतर्गत जमीनधारक प्रमाणपत्र (लागू असल्यास) | | | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **जिल्हा स्तर एकूण ८ कागदपत्र-**<br>१. शेतकरी आयडी<br>२. जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>३. सविस्तर प्रकल्प अहवाल<br>४. बँकेचे मंजुरी पत्र<br>५. काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र<br>६. देयक (Invoice) व बिल<br>७. संमतीपत्र (एकापेक्षा जास्त जमीनधारक असल्यास)<br>८. वनहक्क कायदा (FRA) अंतर्गत जमीनधारक प्रमाणपत्र (लागू असल्यास) | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | **उपविभाग स्तर एकूण ७ कागदपत्र-**<br>१. शेतकरी आयडी (Farmer ID)<br>२. जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>३. साहित्याचे बिल (पहिल्या स्थळ पडताळणीपूर्वी)<br>४. देयक (अंतिम)<br>५. संमतीपत्र (एकापेक्षा जास्त जमीनधारक असल्यास)<br>६. संमतीपत्र (संरचनात्मक सिंचन प्रणालीच्या निवडीसाठी)<br>७. FRA जमीनधारक प्रमाणपत्र (लागू असल्यास) | | | |
| | | **राज्यस्तर एकूण ३१ कागदपत्र-**<br>१. आधार कार्ड<br>२. जमिनीचा ७/१२ व ८-अ उतारा<br>३. जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>४. संयुक्त जमीनधारक असल्यास संमतीपत्र / भाडेपट्ट्याने जमीन असल्यास नोंदणीकृत भाडेकरार / बिगर कृषी जमिनीसाठी एमआयडीसीचे वाटपपत्र<br>५. एफआरए (वनहक्क) प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>६. बँकेचे मुदत कर्ज मंजुरीपत्र / तत्त्वतः मंजुरीपत्र (In-Principle Approval Letter)<br>७. प्रकल्पाचे संकल्पनापत्र (Concept Note)<br>८. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)<br>९. प्रकल्पासाठी बँकेचे मुदत कर्ज मंजुरीपत्र<br>१०. बँक मूल्यांकन अहवाल (Bank Appraisal Report) | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | ११. प्रकल्प भागीदारी संस्थेचा असल्यास, दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत १५ वर्षांचा भाडेकरार<br>१२. फर्म / कंपनी नोंदणी प्रमाणपत्र<br>१३. भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करारनामा किंवा कंपनी / फर्म असल्यास तिचे संविधान / उपनियम<br>१४. प्रकल्प उद्योग सुरू करण्यासाठी संबंधित कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र (ग्रामपंचायत / नगरपालिका / एमआयडीसी)<br>१५. सक्षम प्राधिकरणाकडील बांधकाम परवानगी व मंजूर नकाशा (ग्रामपंचायत / नगररचना विभाग / नगरपालिका / एमआयडीसी)<br>१६. स्थापत्य अभियंता किंवा कंत्राटदार यांच्याकडील नागरी बांधकामाचा अंदाजपत्रक<br>१७. विहित नमुन्यातील बेसिक डेटा शीट (रेफ्रिजरेशन अभियंता व अर्जदार / लाभार्थी यांच्या प्रतिहस्ताक्षरासह) | | | |
| | | १८. विहित नमुन्यातील हीट लोड कॅल्क्युलेशन शीट (रेफ्रिजरेशन अभियंता व अर्जदार / लाभार्थी यांच्या प्रतिहस्ताक्षरासह)<br>१९. कोल्ड स्टोरेज / रायपनिंग चेंबरसाठी विहित नमुन्यातील ऊर्जा कार्यक्षमतेचे प्रमाणपत्र (Energy Efficient Sheet)<br>२०. जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमाणपत्र<br>२१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र (फक्त प्रक्रिया प्रकल्पासाठी)<br>२२. भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) परवाना<br>२३. विहित नमुन्यातील प्रवर्तकाचे हमीपत्र | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | २४. प्रकल्पासाठी आवश्यक यंत्रसामग्री व बांधकामाची कोटेशन<br>२५. रेफ्रिजरेटेड वाहन असल्यास प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) नोंदणी प्रमाणपत्र<br>२६. विहित नमुन्यातील बँकेच्या कर्ज अनुदान राखीव निधी खात्याचा तपशील<br>२७. सनदी लेखापाल (CA) यांचे प्रकल्प खर्च प्रमाणपत्र<br>२८. सनदी अभियंता (Chartered Engineer) यांचे बांधकाम खर्च प्रमाणपत्र व एनएचबी / एनसीसीडी (NHB/NCCD) यांच्या<br>२९. विहित नमुन्यातील तांत्रिक बांधकाम प्रमाणपत्रप्रकल्पासाठी आवश्यक यंत्रसामग्री व बांधकामाची जीएसटीसह बिले (बांधकाम व यंत्रसामग्री बिलांचे स्वतंत्र सारांश जोडावेत व बिले क्रमवार जोडावीत) | | | |
| | | ३०. कर्ज वितरण पत्र / प्रमाणपत्र३१. विहित नमुन्यातील प्रकल्प पूर्णत्व प्रमाणपत्र | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **तालुका स्तर पूर्व मंजुरी- २**<br>१. सहाय्यक कृषी अधिकारी<br>२. तालुका कृषी अधिकारी<br>**तालुका स्तर मंजुरीनंतर- ३**<br>१. मंडळ कृषी अधिकारी<br>२. तालुका कृषी अधिकारी<br>३. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | **जिल्हास्तर पूर्व मंजुरी- २**<br>१. कृषी उपसंचालक<br>२. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (DSAO)<br>**जिल्हास्तर मंजुरीनंतर- २**<br>१. कृषी उपसंचालक<br>२. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (DSAO) | | | |
| | | **उपविभागस्तर पूर्व मंजुरी- २**<br>१. सहाय्यक कृषी अधिकारी (AAO)<br>२. तालुका कृषी अधिकारी (TAO)<br>**उपविभाग स्तर मंजुरीनंतर- ३**<br>१. मंडळ कृषी अधिकारी (CAO)<br>२. उपविभागीय कृषी अधिकारी (SDAO)<br>३. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (DSAO) | | | |
| | | **राज्यस्तर पूर्व मंजुरी- २**<br>१. उपसंचालक (फलोत्पादन)<br>२. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (DSAO)<br>**राज्यस्तर मंजुरीनंतर- २**<br>१. उपसंचालक (फलोत्पादन) + उपविभागीय कृषी अधिकारी + मंडळ कृषी अधिकारी + तांत्रिक सल्लागार<br>२. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (DSAO) | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | **एकूण रकाने (Fields) -११,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ४,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-७ | **काजू कलमे वाटप करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ४** | | **राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY)- मागणीनुसार काजू कलमे उपलब्ध करून देणे** |
| | | | १ | घटक निवडणे - फलोत्पादन | |
| | | | २ | योजना निवडणे - मागेल त्याला काजू कलमे | |
| | | | ३ | क्षेत्र भरणे | |
| | | | ४ | हमीपत्र चेकबॉक्स टिक करणे | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण १ कागदपत्र-**<br>१. हमीपत्र | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **पूर्व-मंजुरी- २ (Presanction-२)**<br>१. सहाय्यक कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी, | | | |
| | | **मंजुरीनंतर- २ (Postsanction-२)**<br>१. सहाय्यक कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी. | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | **एकूण रकाने (Fields) -३०,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ३,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-२७ | **सिंचन सुविधा साधने करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ३** | | **१. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (Outside Tribal Sub Plan - OTSP)**<br>**२. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (Tribal Sub Plan - TSP)**<br>**३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना** |
| | | | १ | शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) | |
| | | | २ | योजनेतील पसंतीचा घटक | |
| | | | ३ | बिल/ देयक / कोटेशन / चाचणी अहवाल (Test Report) | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण ५ कागदपत्र-**<br>१. शेतकरी ओळखपत्र (Farmer ID)<br>२. जात प्रमाणपत्र<br>३. दिव्यांगत्व प्रमाणपत्र<br>४. संयुक्त वहीती खाते (संयुक्त जमीन) असल्यास संमतीपत्र (अनिवार्य नाही) / हमीपत्र (MahadBT २.० वर उपलब्ध करून देण्यात येईल)<br>५. कोटेशन / चाचणी अहवाल (Test Report) | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **मंजुरी स्तर - ३**<br>१. कृषी अधिकारी पंचायत समिती<br>२. कृषी विकास अधिकारी (ZP),<br>३. जिल्हा कृषि अधिकारी (ZP), | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | **एकूण रकाने (Fields) -२६,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १२,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१४ | **शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १२** | | **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना** |
| | | | १ | आधार क्रमांक | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | | २ | जात(जर लागू असेल तर ) | |
| | | | ३ | अपंगत्व (जर लागू असेल तर ) | |
| | | | ४ | जिल्हा (शेतकरी ओळख क्रमांक जर असेल तर स्वयंचलित रित्या भरले जाईल) | |
| | | | ५ | ७/१२ उतारा (शेतकरी ओळख क्रमांक नसेल तर हाताने टाकावे लागेल) | |
| | | | ६ | अर्जदार प्रकार | |
| | | | ७ | अपघाताचा प्रकार | |
| | | | ८ | अपघातग्रस्त शेतकऱ्यांशी नाते | |
| | | | ९ | अपघाताचा प्रकार | |
| | | | १० | अपघाताची तारीख | |
| | | | ११ | मृत्यूची तारीख | |
| | | | १२ | अपघाताच्या प्रकारानुसार आवश्यक कागदपत्रे | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण ६ कागदपत्र-**<br>१. ७/१२ उतारा (शेतकरी आयडी उपलब्ध असल्यास स्वयंचलित प्राप्त)<br>२. मृत्यू प्रमाणपत्र<br>३. गाव नमुना क्र. ६-क नुसार तलाठी यांनी मंजूर केलेली कायदेशीर वारस नोंद<br>४. मृत शेतकऱ्याची ओळख व वय सिद्ध करणारे कागदपत्र (शाळा सोडल्याचा दाखला / आधार कार्ड / मतदार ओळखपत्र किंवा इतर कोणतेही वैध ओळखपत्र)<br>५. प्रथम माहिती अहवाल (FIR),<br>६. सहावे कागदपत्र अपघात प्रकरणनिहाय बदलते. | | | |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक</th><th>GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील</th><th>अ. क्र.</th><th>अर्जदाराने भरावयाचे रकाने</th><th>संबंधित योजना</th></tr>
<tr><td>क.</td><td>मंजुरी टेबल/डेस्कची संख्या<br>(Number of Approval Desks)</td><td>मंजुरी स्तर - ३<br>१. उप कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी,<br>३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td rowspan="13">अ.</td><td rowspan="13">अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields)</td><td rowspan="13">एकूण रकाने (Fields) -१६,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields) - १२,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields) - ४</td><td colspan="2">प्रक्रिया उद्योग करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields) - १२</td><td rowspan="14">मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना - अन्न प्रक्रिया प्रकल्प</td></tr>
<tr><td>१</td><td>अर्जदाराचा प्रकार (वैयक्तिक, स्वयं-सहायता गट, एलएलपी, कंपनी,शेतकरी उत्पादक कंपनी , सहकारी संस्था)</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रकल्पाचे नाव आणि पत्ता</td></tr>
<tr><td>३</td><td>प्रक्रिया करावयाचा कच्चा माल</td></tr>
<tr><td>४</td><td>प्रक्रिया क्षमता</td></tr>
<tr><td>५</td><td>निर्माण होणारा रोजगार</td></tr>
<tr><td>६</td><td>प्रकल्पाचा प्रकार (नवीन / विस्तार/अन्न प्रक्रिया सुविधेसह कोल्ड चेन)</td></tr>
<tr><td>७</td><td>कर्जविषयक माहिती (बँक कर्ज)</td></tr>
<tr><td>८</td><td>सविस्तर प्रकल्प अहवाल</td></tr>
<tr><td>९</td><td>विविध राज्य /केंद्र शासनाच्या योजनांतर्गत प्राप्त अनुदान (प्राप्त झाले असल्यास )</td></tr>
<tr><td>१०</td><td>जोडलेली कागदपत्रे</td></tr>
<tr><td>११</td><td>बाजारपेठेसंबंधी माहिती</td></tr>
<tr><td>१२</td><td>प्रकल्प उभारणीचे संभाव्य वेळापत्रक</td></tr>
<tr><td>ब.</td><td>आवश्यक कागदपत्रांची संख्या<br>(Number of Documents)</td><td>एकूण कागदपत्रे - १२ पूर्व-मंजुरी - ७<br>१.सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)<br>२. बँक कर्जमंजूरी पत्र व मुल्यांकन अहवाल<br>३.यंत्रसामुग्रीचे दरपत्रक<br>४.इमारतीचा आराखडा</td><td></td><td></td></tr>
</table>

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | ५. तांत्रिक नागरी (Technical Civil Work) कामाचे अंदाजपत्रक (असल्यास)<br>६.संस्था नोंदणी प्रमाणपत्र७.जागा भाडेकरारनामा (असल्यास) | | | |
| | | **मंजुरीनंतर - ५**<br>१. बँकेचे ना हरकत प्रमाणपत्र<br>२. बँक अनुदान राखीव खात्याची माहिती (Reserve Fund Account)<br>३.यंत्रसामुग्रीचे खरेदीबिले<br>४.स्थापत्य अभियंता, यांत्रिक अभियंता व सनदी लेखपाल (CA) यांचे प्रमाणपत्र (प्रकल्प मुल्याबाबत)<br>५. सी.ए. (Chartered Accountant) उपयोगिता प्रमाणपत्र नोंदणी क्रमांक टाकल्यानंतर आपोआप येणारे (Auto Fetch) कागदपत्रे - FSSAI, उद्यम, पॅन व आधार. | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **मंजुरीसाठी स्तर - ३**<br>१.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/ जिल्हा समिती,<br>२. कृषि उपसंचालक कृषि प्रक्रिया (राज्यस्तर),<br>३. संचालक कृषि प्रक्रिया व नियोजन/ राज्य समिती<br>**मंजुरीनंतर स्तर - ३**<br>१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/ जिल्हा समिती,<br>२. कृषि उपसंचालक कृषि प्रक्रिया (राज्यस्तर),<br>३. संचालक कृषि प्रक्रिया व नियोजन/ राज्य समिती | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | एकूण रकाने (Fields) -१४,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ४,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)- १० | **शेततळे करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ५** | | **मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना- शेततळे** |
| | | | १ | घटक प्रकार | |
| | | | २ | इनलेट/आऊटलेट व सिल्ट ट्रॅपसह/विरहित | |
| | | | ३ | आकारमान (लांबी x रुंदी x खोली) | |
| | | | ४ | बाजू उतार (१:१/१:१.५) | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण कागदपत्र-** कागदपत्र आवश्यकता नाही. | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **पूर्व-मंजुरी- २ (Presanction-२)**<br>१. सहाय्यक कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी, | | | |
| | | **मंजुरीनंतर- २ (Postsanction-२)**<br>१. उप कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | **अ. वैयक्तिक घटकासाठी भरले जाणारे एकूण रकाने- १५,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ३,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१२, | **सेंद्रिय शेती वैयक्तिक घटकासाठी अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ३** | | **परंपरागत कृषि विकास योजना** |
| | | | १ | शेतकरी ओळख क्रमांक | |
| | | | २ | सेंद्रिय शेती क्षेत्र (हेक्टर) | |
| | | | ३ | गट नोंदणी प्रमाणपत्र | |
| | | **ब. शेतकरी गटासाठी भरले जाणारे एकूण रकाने-१०,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ९,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१, | **सेंद्रिय शेती शेतकरी गटासाठी अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ९** | | |
| | | | १ | गट नोंदणी प्रमाणपत्र व दिनांक | |
| | | | २ | गटाचे नाव | |
| | | | ३ | सदस्य संख्या (Addition of Members) | |
| | | | ४ | गाव | |
| | | | ५ | तालुका | |
| | | | ६ | जिल्हा | |
| | | | ७ | खाते क्रमांक | |
| | | | ८ | आय.एफ.एस.कोड | |
| | | | ९ | गटातील अधिकृत व्यक्तीचा शेतकरी ओळख क्रमांक | |
| | | **क. शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत भरले जाणारे एकूण रकाने- १०,** | **सेंद्रिय शेती शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत भरावयाचे रकाने (Fields)- ९** | | |
| | | | १ | शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| | | | २ | शेतकरी उत्पादक कंपनीचे नाव | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ९,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१. | ३ | सदस्य संख्या (Addition of Member) | |
| | | | ४ | गाव | |
| | | | ५ | तालुका | |
| | | | ६ | जिल्हा | |
| | | | ७ | खाते क्रमांक | |
| | | | ८ | आय.एफ.एस.कोड | |
| | | | ९ | अध्यक्ष/सचिव यांचे शेतकरी ओळख क्रमांक | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या<br>(Number of Documents) | **एकूण कागदपत्र- अ. वैयक्तिक घटकासाठी-२**<br>१. गट नोंदणी प्रमाणपत्र (सदस्यांच्या यादीसह)<br>२. जात प्रमाणपत्र | | | |
| | | **ब. शेतकरी गटासाठी- ५**<br>१. देयक<br>२. गट नोंदणी प्रमाणपत्र<br>३. गटाच्या बँक खात्याचा तपशील<br>४. क्षेत्रीय तपासणी अहवाल (छायाचित्रांसह)<br>५. जमीन भाडेकरार (आवश्यक असल्यास) | | | |
| | | **क.शेतकरी कंपनीसाठी- ६**<br>१. देयक<br>२. गट नोंदणी प्रमाणपत्र<br>३. गटाच्या बँक खात्याचा तपशील<br>४. क्षेत्रीय तपासणी अहवाल (छायाचित्रांसह)<br>५. जमीन भाडेकरार (आवश्यक असल्यास<br>६. सविस्तर प्रकल्प अहवाल | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या<br>(Number of Approval Desks) | **पूर्व-मंजुरी- २ (Presanction-२)**<br>१. सहाय्यक कृषि अधिकारी/ ATM/BTM,<br>२. तालुका कृषि अधिकारी | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | **मंजुरीनंतर- ३ (Postsanction-३)**<br>१. मंडळ कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी,<br>३. प्रकल्प संचालक आत्मा. | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | **अ. वैयक्तिक घटकासाठी भरले जाणारे एकूण रकाने- १५,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१३, | **नैसर्गिक शेती वैयक्तिक घटकासाठी अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २** | | **राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान** |
| | | | १ | शेतकरी ओळख क्रमांक | |
| | | | २ | ग्रामपंचायतचे नाव | |
| | | **ब. शेतकरी गटासाठी भरले जाणारे एकूण रकाने- १०,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १०,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-०, | **नैसर्गिक शेती शेतकरी गटासाठी अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- १०** | | |
| | | | १ | गट नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| | | | २ | गटाचे नाव | |
| | | | ३ | गटाचे गाव | |
| | | | ४ | तालुका | |
| | | | ५ | जिल्हा | |
| | | | ६ | खाते क्रमांक | |
| | | | ७ | आय.एफ.एस.कोड | |
| | | | ८ | अध्यक्ष/सचिव यांचे नाव | |
| | | | ९ | सदस्य संख्या (Addition of Member) | |
| | | | १० | अध्यक्ष/सचिव यांचे शेतकरी ओळख क्रमांक | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण कागदपत्र- अ. वैयक्तिक घटकासाठी- ०** | | | |
| | | **ब. शेतकरी गटासाठी- ४**<br>१. देयक (Invoice)<br>२. गट नोंदणी प्रमाणपत्र<br>३. गटाच्या बँक खात्याचा तपशील<br>४. क्षेत्रीय तपासणी अहवाल (छायाचित्रांसह) | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **पूर्व-मंजुरी- २ (Presanction-२)**<br>१. सहाय्यक कृषि अधिकारी/ ATM/BTM,<br>२. तालुका कृषि अधिकारी | | | |
| | | **मंजुरीनंतर- ३ (Postsanction-३)**<br>१. मंडळ कृषि अधिकारी,<br>२. तालुका कृषि अधिकारी,<br>३. प्रकल्प संचालक आत्मा. | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | **एकूण रकाने (Fields) -११,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ५,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-६ | **पीक स्पर्धा करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- ५** | | **पीक स्पर्धा (खरीप आणि रब्बी)** |
| | | | १ | शेतकऱ्याचे स्वयंघोषणापत्र | |
| | | | २ | स्पर्धेसाठी घोषित केलेले एकूण पीक क्षेत्र (हेक्टर) | |
| | | | ३ | प्रवेश शुल्काच्या चलनाची पावतीवरील CIN number | |
| | | | ४ | पिकाचे नाव | |
| | | | ५ | बागायती किंवा कोरडवाहू | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण ४ कागदपत्र-**<br>१. जमीन आरोग्य पत्रिका<br>२. जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास )<br>३. ग्रास चलन (बँक पावती)<br>४. पीक कापणी तपशील समिती सदस्यांच्या स्वाक्षरीसह (अधिकारी /कर्मचारी यांच्यासाठी आवश्यक) | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **मंजुरी स्तर - ३**<br>१. सहाय्यक कृषि अधिकारी,<br>२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,<br>३. आयुक्त कृषि | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | | **कृषी पुरस्कार करिता अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २५** | | **कृषी पुरस्कार** |
| | | | १ | सिंचनाची सुविधा हंगामी आहे की बारमाही | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण रकाने (Fields) -३७,<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २५,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-१२ | २ | गेल्या तीन वर्षातील प्रमुख पिकांखालील क्षेत्र आणि प्रति हेक्टरी उत्पादकता | |
| | | | ३ | कार्य सारांश: स्वतःच्या शेतावर केलेले उत्कृष्ट आणि अनुकरणीय काम किंवा कृषी क्षेत्रातील योगदान - संपूर्ण राज्यासाठी मार्गदर्शक | |
| | | | ४ | जमीन सुपिकतेकरिता केलेल्या उपाययोजना- हिरवळीची खते/जैविक खते/सेंद्रिय खते यांचा वापर | |
| | | | ५ | जमीन सुपिकतेकरिता केलेल्या उपाययोजना- कंपोस्ट पद्धतीने (NADEP, वर्मीकंपोस्ट, बायोडायनामिक कंपोस्ट, पाचट कुजविणे इ.) खतांचा वापर | |
| | | | ६ | जमीन सुपिकतेकरिता केलेल्या उपाययोजना- मृद आरोग्य पत्रिकेनुसार सेंद्रिय कर्बाचे प्रमाण | |
| | | | ७ | पाण्याचा कार्यक्षम वापर | |
| | | | ८ | पिक संरक्षण उपाययोजना | |
| | | | ९ | अपारंपारिक ऊर्जा साधनांचा वापर-सौरऊर्जा, सौर पंप, बायोगॅस इत्यादी | |
| | | | १० | कृषि यांत्रिकीकरणाचा प्रभावी वापर- स्वयंचलित, Power operated यंत्राचा वापर/शेतीकामामधील मनुष्यबळावरील अनावश्यक कष्ट कमी करणेसाठी स्थानिक परिस्थितीनुसार तयार केलेल्या अवजारांचा वापर | |
| | | | ११ | कृषि अवजारे बँक व त्यामधून कृषि यांत्रिकीकरणाचा वापर | |
| | | | १२ | कृषिपुरक व्यवसाय - दुग्धव्यवसाय, रेशीम उद्योग, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, डुकरांचे पालन, इमू फार्मिंग यांसारख्या संलग्न कृषी उपक्रम | |
| | | | १३ | प्रक्रिया व मूल्यवर्धन - स्वतःच्या शेतीच्या मालावर प्राथमिक प्रक्रिया व त्याद्वारे मालाचे मूल्यवर्धन, स्वतः व्यावसायिक स्तरावर ब्रँडिंग करून विक्री | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | | १४ | राज्य/जिल्हा/तालुका पातळीवरील पिकस्पर्धेतील १ ते ३ क्रमांक विजेता शेतकरी | |
| | | | १५ | राज्य/राष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्थेत प्रशिक्षण | |
| | | | १६ | शेतकरी उत्पादक गट/शेतकरी उत्पादक संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी याचा यापूर्वी किंवा सद्यस्थितीत अध्यक्ष /सदस्य तसेच शेतकरी उत्पादक गट/शेतकरी उत्पादक संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या माध्यमातून केलेले कृषि विस्ताराचे कार्य | |
| | | | १७ | कृषिविषयक साहित्य निर्मिती- १.दूरचित्रवाहिन्या २. रेडिओ ३. वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके, पुस्तके, माहितीपत्रके इ.मधून स्वलेखन ४.समाजमाध्यमे प्रसार (युट्युब, फेसबुक,व्हाट्सप, इन्स्टाग्राम, ट्वीटर इ.) ५.विविध माध्यमांद्वारे यशोगाथा प्रसारण इ.प्रसारमाध्यमांद्वारे प्रचार व प्रसिद्धी | |
| | | | १८ | कृषिविषयक नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार- कृषिविषयक नाविन्यपूर्ण, कमी खर्चातील व सहज स्वीकारता येणारा अभिनव प्रयोग/उत्पादन/पिकाचे वाण/तंत्रज्ञानाचे विकसन व त्याची अनुकरणीयता (इतर शेतकऱ्यांकडून अवलंब) | |
| | | | १९ | सेंद्रिय शेतीचा यशस्वी अवलंब | |
| | | | २० | शेतात कृषी प्रशिक्षण/प्रात्यक्षिक केंद्र विकसित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन | |
| | | | २१ | महाविस्तार app डाऊनलोड करून त्याचा वापर | |
| | | | २२ | डिजिटल क्रॉप सर्व्हे मध्ये पिकांची अचूक नोंद | |
| | | | २३ | कोरडवाहू शेती/दुष्काळ/अतिवृष्टी /अवकाळी पाऊस/गारपीट/तापमानातील बदल/कीड व रोगांचा मोठा प्रादुर्भाव यांसारख्या हवामान बदलास अनुरूप शेती पद्धतीचा अवलंब | |
| | | | २४ | प्रतिकूल परिस्थितीवर (उदा.क्षारपड जमीन/मुरमाड किंवा खडकाळ जमीन/वन्यप्राण्यांचा उपद्रव/डोंगराळ क्षेत्र/आदिवासी क्षेत्र/मजुरांची कमतरता/बाजारभावातील चढ- | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | | | उतार/वीजपुरवठ्यातील अडचणी यांसारख्या) मात करून साधलेला विकास | |
| | | | २५ | जैवविविधता (उदा.दुर्मिळ व स्थानिक देशी पिकांच्या जातींचे संवर्धन/वाऱ्यापासून संरक्षण पट्टा/बांबू आधारित कृषिवनशेती/शेती + वृक्ष + चारा, वनवृक्ष + फळझाडे यांसारख्या बहुउद्देशीय पद्धतीचा अवलंब/ शेतात जैवविविधता पट्टा/परागीभवन (उदा.मधुमक्षिकापालन) करणाऱ्या कीटकांसाठी अनुकूल व्यवस्था/जैविक कीड व्यवस्थापन (IPM) इ.) राखणेच्या अनुषंगाने केलेल्या बाबी | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण १२ कागदपत्र-**<br>१. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी प्रमाणित मूळ चारित्र्य प्रमाणपत्र<br>२.जात प्रमाणपत्र (ST साठी)<br>३. हिरवळीचे खत / जैविक खत वापराचे छायाचित्र<br>४. माती तपासणी अहवाल<br>५. एकात्मिक पीक संरक्षण- शेताची छायाचित्रे<br>६. पीक स्पर्धा विजेता प्रमाणपत्र<br>७. दूरचित्रवाणी वाहिन्यांचे पत्र/प्रमाणपत्र, स्क्रीनशॉट<br>८. आकाशवाणी केंद्रांचे पत्र/प्रमाणपत्र<br>९. सेंद्रिय शेती प्रमाणपत्र<br>१०. संशोधन संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र<br>११. महाविस्तार ॲप स्क्रीनशॉट<br>१२. डिजिटल पीक सर्वेक्षण (ई-पीक पहाणी) स्क्रीनशॉट व शेतात कंपोस्ट खत तयार करणे/वापराचे जिओ टॅग छायाचित्र | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **मंजुरी स्तर -३** | | | |

| अ. क्र. | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा घटक | GPR नुसार अंमलबजावणीतील सुधारणा तपशील | अ. क्र. | अर्जदाराने भरावयाचे रकाने | संबंधित योजना |
|---|---|---|---|---|---|
| | | १.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी<br>२. विभागीय कृषी सह संचालक<br>३. कृषी आयुक्त | | | |
| अ. | अर्ज नमुन्यातील (Application Form) एकूण रकाने (Fields) | **अ. वैयक्तिक प्रात्यक्षिक घटकासाठी भरले जाणारे एकूण रकाने-५,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-३, | **कृषी व कृषी संलग्न प्रात्यक्षिके आणि शेतीशाळा वैयक्तिक प्रात्यक्षिक घटकासाठी अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २** | | **राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांमध्ये सुधारणाकरिता सहाय्य (आत्मा)** |
| | | | १ | शेतकरी ओळख क्रमांक (Farmer id) | |
| | | | २ | आधार क्रमांक | |
| | | **ब. वैयक्तिक शेतीशाळा घटकासाठी भरले जाणारे एकूण रकाने- ०५,**<br>अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २,<br>आपोआप भरले जाणारे रकाने (Fields)-३, | **कृषी व कृषी संलग्न प्रात्यक्षिके आणि शेतीशाळा वैयक्तिक शेतीशाळा घटकासाठी अर्जदाराने भरावयाचे रकाने (Fields)- २** | | |
| | | | १ | शेतकरी ओळख क्रमांक (Farmer id) | |
| | | | २ | आधार क्रमांक | |
| ब. | आवश्यक कागदपत्रांची संख्या (Number of Documents) | **एकूण कागदपत्र- अ. वैयक्तिक प्रात्यक्षिक/शेतीशाळा घटकासाठी- ६**<br>१. अर्ज<br>२. शेतकरी ओळखपत्र<br>३. मृदा परीक्षण अहवाल<br>४. देयके<br>५. क्षेत्र पाहणी अहवाल (छायाचित्र इ.)<br>६. बँक तपशील | | | |
| क. | मंजुरी टेबल/डेस्कची संख्या (Number of Approval Desks) | **अंमलबजावणी - २ (Execution-२)**<br>१. ATM/BTM,<br>२. सहाय्यक संचालक लेखा १ | | | |
| | | **मंजुरी- २ (Approval -२)**<br>१. तालुका कृषि अधिकारी,<br>२. प्रकल्प संचालक आत्मा. | | | |